नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक १९/०८/२०२२ (शुक्रवार)**

**(सायंकाळ)**

---

## खून करणाऱ्या आरोपीला आजिवन कारावासची कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. कळमेश्वर :— दिनांक २०/१२/२०१५ चे २०.१० वा. दरम्यान फिर्यादी नामे— सौ. कविता अनिल धुडस, वय २६ वर्ष, रा. महादुला नागपूर यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे अप. क्र. ३६२/२०१५ कलम ३०२, ३०७, ४९८ अ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक २०/१२/२०१५ चे १९.०० वा. दरम्यान आरोपी नामे— अनिल मोतीराम धुडस, वय ३५ वर्ष, रा. महादुला कोराडी, नागपूर हा त्याची पत्नी फिर्यादी हीचे चारित्र्यावर संशय घेवून शारीरिक व मानसीक त्रास देत असल्याने ती त्याचे पासून वेगळी राहुन के.टी.एम. कंपनी कळमेश्वर येथे काम करीत होती. फिर्यादी ही मैत्रीणी सोबत बाजारात जात असता आरोपीने धारदार चाकुने तिचे हातावर, कुशीवर मारून गंभीर जखमी करून जिवानिशी ठार केले. सदर प्रकरण्याचे तपास तत्कालीन सपोनि श्री. अरूण अग्रवाल पो.स्टे. कळमेश्वर यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टमध्ये सादर केले. आज दिनाक १९/०८/२०२२ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री. देशमुख, अतिरीक्त जिल्हा सत्र न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद आरोपीला कलम ३०२ भादंवि. मध्ये आजिवन कारावास व ५,०००/—रु. दंड व दंड न भरल्यास १ महिना सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे. सरकारचे वतीने एपीपी श्री. साखरे यांनी काम पाहीले.

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. उमरेड :— अंतर्गत ०२ कि. मी. अंतरावरील मोहपा रोड एमआयडीसी परीसर येथे दिनांक १८/०८/२०२२ चे ०३.३० वा. ते ०३.४५ वा. दरम्यान उमरेड पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन उमरेड पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन एम. एच.—४०/ बी.एल— ०७२२ क्रमांकाच्या बोलेरो पिकअप गाडीला थांबवुन तपासले असता सदर वाहनात आरोपी १) अजय धनराज चौधरी वय २५ वर्ष रा. नागतरोडी २) कुंदन गब्बर गोयल वय २२ वर्ष रा, निष्ठी ता, पवनी जि,भंडारा यांच्या ताब्यातुन ५(गाई, गोरे) जनावरे निर्दयतेने वाहतुक करतांना मिळुन आले. वाहनासह एकुण किंमती ५,६३,०००/— रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे सहायक फौजदार अजितसिंग ठाकुर पो.स्टे. उमरेड यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे वरील आरोपीविरुध्द कलम ११(१)११(१)(च) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम ५ए(१) महाराष्ट्र प्राणी रक्षण अधिनियम सहकलम १८४ मोवाका काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नाईक प्रदीप चौरे मो.क्र. ७७९८६६८८३८ हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

**१) पो.स्टे. खापरखेडा:–** अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील औष्णीक विदयुत केंद्र खापरखेडा येथे दि. १८/०८/२०२२ चे ०१.४५ वा. सुमारास मृतक नामे ०१) संतोष राजेश मेश्राम, वय २० वर्ष, रा. कोराडी नागपुर, ०२) प्रविण नारायण शेंडे, वय ३५ वर्ष, रा. जयभोले नगर, चनकापुर हे औष्णीक विदयुत केंद्र खापरखेडा येथे स्टॅगर मशीनवर ऑपरेटरवर काम करीत असता स्टॅगर मशीन हा मधातुन तुटन जमीनीवर खाली पडल्याने त्याचे खाली दबुन त्यांचे मृत्यु झाले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– राष्ट्रपाल वामनरावजी वासनिक, वय ३९ वर्ष, रा. बिना यांचे रिपोर्टवरुन पो. स्टे. खापरखेडा येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोउपनि श्री जाधव मो.नं. ९९२३१०४३१० हे करीत आहे.

**२) पो.स्टे. उमरेड :–** अंतर्गत ०५ कि. मी. अंतरावरील नवेगाव शिवार येथे दि. १८/०८/२०२२ चे २३.५८ वा. सुमारास **लक्ष्मण राघोजी कडसकर (मृतक), वय ४५ वर्ष रा. ठाणा उमरेड** हे हर्षल वाघमारे रा. उमरेड यांनी ठेक्याने केलेल्या शेतात धुऱ्याला जंगली जनावर आत शिरून पिक खावुन नुकसान करू नये या उद्देशाने लावण्यात आलेल्या तारेच्या कंपाडला इलेक्ट्रीक करंट लागुन असल्याने पाय लागुन स्पर्श होताच करंट लागला. त्यांना ग्रामीण रूग्णालय उमरेड येथे उपचाारकामी नेले असता उपचारादरम्याण त्यांचा मृत्यु झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– इस्तारी राघोजी कडसकर, वय ५४ वर्ष, रा. ठाणा उमरेड यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोउपनि श्री वाघ मो. नं. ९९७५८१८४०१ हे करीत आहे.

**३) पो.स्टे. केळवद :–** अंतर्गत २५ कि. मी. अंतरावरील मौजा नांदागोमुख शमशान घाटच्या मागे येथे दि. १८/०८/२०२२ चे १२.३० वा. पुर्वी **दयाराम नजरूजी कंगाले(मृतक), वय ७५ वर्ष रा. नांदोगोमुख** हा शौचास नांदागोमुख येथील श्मशान घाटचे मागे नदीच्या काठी गेला असता त्याचे पाय घसरून नदीच्या डोहमध्ये पडून पाण्यात बुडुन मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– मोरेश्वर मोतीराम उईके, वय ४९ वर्ष रा. गोंडीवाटोना ता. सौंसर (म.प्र)यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. केळवद येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार रामराव पवार मो.न ७८७५९८३३६० हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**